**भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा:-**

**या परीक्षा कोणाला देणे आवश्यक आहे :-**

शासन अधिसूचना क्र.टलेप्र-१०८१/सीआर-३४४/२०ब, दिनांक ६ मे, १९९१ अनुसार शासन सेवेतील इंग्रजी लघुलेखक, लघुटंकलेखक यांना भाषा संचालनालयाची ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन व ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन परीक्षा व इंग्रजी लिपिक टंकलेखक यांना ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन परीक्षा शासन सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १००८/२०५३/प्र.क्र. १३३/०८/२० ब, दि. ४.२.२००९ अन्वये मराठी टंकलेखन परीक्षा संगणकावर घेण्यात येतात.

**परीक्षेतून सूट मिळण्याबाबतची तरतूद :-**

इंग्रजी लघुलेखक/लघु-टंकलेखक/टंकलेखक यांना त्यांच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय आहे.

**परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास / सूट न मिळाल्यास दंडाबाबतची तरतूद:-**

जे इंग्रजी लघुलेखक, टंकलेखक विहित मुदतीत मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना विहीत मुदतीनंतर ते परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेपर्यंत त्यांच्या वार्षिक वेतनवाढी रोखून ठेवण्यात येतील.

अशा प्रकारे रोखून धरलेल्या वेतनवाढी शासकीय कर्मचारी ज्या दिवशी परीक्षा उत्तीर्ण होईल किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल, त्या तारखेला वेतनवाढी देय होतील आणि जणूकाही त्यांच्या वेतनवाढी रोखल्या नव्हत्या असे समजून त्या उपर्जित होतील. परंतु, थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

(पहा :- सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.टलेप-१०८१/सीआर-३४४/वीस-ब, दि.६ मे, १९९१ व मराठी भाषा विभाग सुधारणा केलेली दि.०५ ऑक्टोबर, २०२१ अधिसूचना.)

* * *